क्र.२२ एलसीबी/नाहसं/अजाज/मासिक अहवाल/ /२०२४
पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर,
स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा,
दुरध्वनी क्र.०२३१-२६६५६११७, फॅक्स क्र.
०२३१-२६६७२१२
ई मेल- sp.kolhapur@mahapolice.gov.in
दिनांक:- **/०८/२०२४**

---

**प्रति,**
**मा.अपर पोलीस महासंचालक,**
**नागरी हक्क संरक्षण,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**विषय:-** माहिती आयुक्त महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशाची अंमलबजावणीबाबत.

**संदर्भ:-** मा.यांचेकडील क्र.-पोमस/४१/नाहसं-टे.नं.२/माहिती आयुक्त म.रा.यांच्या आदेशाची अंमलबजावणी/१०५/२०२१-३६० दि.०१/०४/२०२१

***

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून सादर की, अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ व सुधारीत अधिनियम २०१६ तरतूदी नुसार उपेक्षित घटकातील जनतेला यथोचित न्याय मिळावा याकरीता माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ मधील तरतूदी नुसार जनहित असलेल्या माहिती प्रसारणाबाबत राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी दिलेल्या आदेशान्वये कोल्हापूर जिल्हा पोलीस घटकाची माहे **जुलै - २०२४** अखेर माहिती https://kolhapurpolice.gov.in /Atrocities संकेतस्थळावर प्रसिध्दी केलेली आहे.

**(महेंद्र क.पंडित)** **भा.पो.से.**
पोलीस अधीक्षक, कोल्हापूर

**प्रत माहितीस्तव सादर,**
पोलीस अधीक्षक,ना.ह.सं.
कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर

**मुददा क्रमांक १-**

अ.जा.अ.ज.(अ.प्र.) कायदयानुसार दाखल तक्रारीची नोंद (FIR) सदर बाबत FIR ची नोंद पाहणेसाठी ऑनलाईन पध्दतीने citzen.mahapolice.gov.in/Citizen/MH/PublishedFIRs.aspx या संकेतस्थळावर जावून FIR पाहणेची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

**मुददा क्रमांक २-**

**अ.जा.अ.ज.(अ.प्र.) कायदा १९८९ व नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५ अंतर्गत दाखल गुन्हयातील आरोपी अटकेची माहिती -** माहे **जुलै -२०२४** मध्ये अनुसूचित जाती जमाती कायदयाखाली दाखल गुन्हयांमध्ये **२** आरोपी यांना अटक करण्यात आले आहेत व **१** आरोपी यांना सी.आर.पी.सी. ४१-अ-१ प्रमाणे नोटीसची बजावणी करण्यात आली आहे.

**मुददा क्रमांक ३-**

**जामीनाबाबत-**अ.जा.अ.ज.(अ.प्र.) कायदयान्वये जामीनाबाबत तरतूद नसली तरीसुध्दा मिळालेल्या जामीनाच्या संयुक्तीक कारणासह आणि कलम ४(१)(c)(d) माहिती अधिकार कायदा २००५ अन्वये पिडीत व्यक्तीला सदर जामीन मिळविलेल्या बाबतची माहिती संबंधीत जनमाहिती अधिकारी यांचेकडून देण्यात येईल.

**मुददा क्रमांक ४-**

**अ.जा.अ.ज.(अ.प्र.) कायदा १९८९ व नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५ अंतर्गत दाखल गुन्हयापैकी न्यायालयात दाखल केलेल्या दोषारोप बाबतची माहिती-** अ.जा.अ.ज.(अ.प्र.) कायदा अन्वये माहे **जुलै -२०२४ मध्ये ०५ गुन्हयांचे दोषारोप** मा.न्यायालयात दाखल केले आहेत तसेच **१ गुन्ह्याचे NC फायनल** पाठवण्यात आले आहे.

**मुददा क्रमांक ५-**

**अ.जा.अ.ज.(अ.प्र.) कायदा १९८९ व नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५ अंतर्गत माहे जुलै -२०२४ अखेर तपासावर प्रलंबित गुन्हयाची माहिती -**

| अ.नं. | पोलीस ठाणे /गुन्हा रजि नंबर व कलम | प्रलंबिततेचे कारण |
|---|---|---|
| १. | हातकणगले पोलीस ठाणे गुरनं १९३/२०२४ भादविस क ३६३,३६६(अ), ३७६(२)(एन), बालकाचे लैंगीक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४,८,१२ सह अनुसुचित जाती अनुसुचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा सन १९८९ चे सुधारीत अधिनियम सन २०१५ चे कलम ३(१)(w)(i)(ii), ३(२)(va), ३(२)(v) | दोषारोप पत्र पाठविणेवर |
| २. | शिवाजीनगर पोलीस ठाणे गुरनं ५५४/२०२४ भादविस क ३०७,३२३ ,५०४, ५०६,१४३, १४७, १४८,१४९ सह अनुसुचित जाती अनुसुचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा सन १९८९ चे सुधारीत अधिनियम सन २०१५ चे कलम ३(१)(r)(s), ३(१)(v) | आरोपी यांना अटक करुन पुढील तपास करणेवर |
| ३. | कोडोली पोलीस ठाणे गुरनं १८४/२०२४ भादविस क ३५४(ड), ३२३,५०४,५०६,३४ सह अनुसुचित जाती अनुसुचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा सन १९८९ चे सुधारीत अधिनियम सन २०१५ चे कलम ३(१)(w)(i),३ (२)(va) ,सह ६ सह नागरी हक्क संरक्षण कायदा कलम ७,१ (ड) प्रमाणे | फिर्यादी व साक्षीदार यांचे सीआरपीसी १६४ प्रमाणे जबाब होणेवर व संनियंत्रण समिती मंजूरी घेणेवर |

| | | |
|---|---|---|
| ४. | कोडोली पोलीस ठाणे गुरनं १८५/२०२४ भादविस क ४५२,३५४(ब), ५०६ सह अनुसुचित जाती अनुसुचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा सन १९८९ चे सुधारीत अधिनियम सन २०१५ चे कलम ३(१)(w)(i),३(२)(va) प्रमाणे | फिर्यादी व साक्षीदार यांचे सीआरपीसी १६४ प्रमाणे जबाब होणेवर व संनियंत्रण समिती मंजूरी घेणेवर |
| ५. | शिवाजीनगर पोलीस ठाणे गुरनं ६६८/२०२४ बी.एन.एस..कलम ११५(२),११८(१), ३५१(२),३५२ सह अनुसुचित जाती अनुसुचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा सन १९८९ चे सुधारीत अधिनियम सन २०१५ चे कलम ३(१)(r)(s),३(२)(va) | जखमींचे वैदयकीय प्रमाणपत्र प्राप्त करणे, मध्यवर्ती संनियंत्रण समितीचा अभिप्राय घेणेवर |
| ६. | चंदगड पोलीस ठाणे गुरनं २५३/२०२४ बी.एन.एस..कलम ६५(१),३५१(२),(३), सह बालकांचे लैगिंक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४,८,१२ सह अनुसुचित जाती अनुसुचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा सन १९८९ चे सुधारीत अधिनियम सन २०१५ चे कलम ३(१)(w)(i)(ii), ३(२)(v) | साक्षीदार यांचेकडे तपास करणे. फिर्यादीचे जातीचे प्रमाणपत्र व पॅनकार्ड प्राप्त करणेचे आहे. साक्षीदार यांचे भा.ना.सु.सं.सन २०२३ चे कलम १८३ प्रमाणे जबाब प्राप्त करणेचे आहेत. आरोपीचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करणेचे आहे. आरोपीचे अंगावरील जप्त केलेली कपडे व वैद्यकीय नमुने केमीकल तपासणीसाठी पाठविणेची आहेत. गुन्ह्याचे तपासकामी सरकारी अभियोक्ता यांचेकडून अभिप्राय प्राप्त करुन, त्रुटींची पुर्तता करणेची आहे. आरोपीविरुध्द दोषारोपपत्र सादर करणेसाठी मंजूरी प्राप्त करुन, मंजूरी आदेशातील त्रुटींची पुर्तता करणे. |

**निर्दोष केसेसची माहिती त्याच्या कारणांसहित माहे जुलै -२०२४**

| अ. क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम | खटला निर्दोष सुटल्याची कारणे |
|---|---|---|---|
| १ | चंदगड | १३४/२०१९ भा.दं.वि.सं. कलम ३५३,३२३,५०४, अ.जा.अ.ज.(अ.प्र.) अधिनियम सन १९८९ चे सुधा.अध्या.सन २०१५ चे कलम ३(१)(r)(s), ३(२)(va) | १. यातील फिर्यादी यांचे साक्षीत विसंगतीमुळे,<br>२. साक्षीदार यांचे साक्षीत विसंगती,<br>३. प्रथमदर्शी साक्षी पुरावे नसल्यामुळे<br>४. सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता |

**मुददा क्रमांक ८-**

**अ.जा.अ.ज.(अ.प्र.) कायदा १९८९ चे कलम ४ अन्वये लोकसेवकाने त्याच्या कर्तव्यात केलेल्या कसुरी बाबतची माहिती -** माहे **जुलै -२०२४** मध्ये माहिती **निरंक आहे.**

**मुददा क्रमांक ९-**

**अ.जा.अ.ज.(अ.प्र.) कायदा १९८९ व नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५ अन्वये न्यायालयाने दिलेल्या दोषसिध्दीबाबतची माहिती-** माहे **जुलै -२०२४** मध्ये दोषसिध्दीची माहिती

| अ. क्र. | गु.र.नं. व कलम | शाबीत आरोपींना झालेली शिक्षा | न्यायालयाचे नांव |
|---|---|---|---|
| | राजारामपुरी ६३/२०१७, भादंवि ३०२,४५२,२०१,३४ अजाअजअप्रकाक १९८९ सह सुधारणा अधि.२०१५ चे कलम ३(२)(v) प्रमाणे | दोन्ही आरोपीना जन्मठेपची शिक्षा | जिल्हा न्याया.क्र.५<br>श्री गोंधळेकर सो न्या. कोल्हापूर |

**मुददा क्रमांक १०-**

**अ.जा.अ.ज.(अ.प्र.) कायदा १९८९ व नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५ अन्वये विविध न्यायालयात प्रलंबीत स्थगिती / अपीलांबाबतची माहिती -**

| अनं | पोलीस ठाणे | गुरनं व कलम | खंडपिठाचे नांव | स्थगिती उठविण्यासाठी तपासी अधिकारी यांनी केलेले प्रयत्नाबाबतची माहिती व सदयस्थिती |
|---|---|---|---|---|
| ०१ | | | | निरंक |

**मुददा क्रमांक १२ -**

अ.जा.अ.ज.(अ.प्र.) कायदा १९८९ व नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५ अन्वये प्रकरणांची जलद गतीने सुनावणी होण्याकरीता विशेष न्यायालयांची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच न्यायालयामध्ये सरकारी अभियोक्ता व पैरवी अधिकारी यांचे मार्फत साक्षीदार, फिर्यादी, पंच यांना सखोल मार्गदर्शन करणेत येत असते. अशा गुन्हयांचे तपास ६० दिवसात पुर्ण करणेबाबत तपासी अधिकारी यांना कालमर्यादा असते. न्यायालयात न्यायालयीन प्रक्रियेनुसार गुन्हयांची निर्गती होते.

**मुददा क्रमांक १५-**

**अत्याचार पिडीत यांनी अ.जा.अ.ज.(अ.प्र.) कायदा १९८९ व नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५ या अधिनियमाखालील कायदयान्वये (POA Act १९९ & PCR १९५५) प्रथम खबर नोंद केल्यानंतर त्याबाबतीत त्याचे विरूध्द क्रॉस गुन्हे दाखल बाबतची सांख्यीकी माहिती, व अशा गुन्हयांना प्रतिबंध होण्याकरीता राज्य शासनाने केलेल्या उपाययोजना-** माहे **जुलै -२०२४ मध्ये क्रॉस गुन्हा निरंक आहे**. सदर क्रॉस गुन्हयांना प्रतिबंध होणेकरीता शासनामार्फत समाजातील लोकांना शांततेचे आवाहन करणेत येत असते तसेच उपद्रवी व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करणेत येत असते. बैठका व कार्यशाळा घेवून दोन्ही तेढ निर्माण होणार नाही याबाबत मार्गदर्शन करण्यात येत असते.

**मुददा क्रमांक १७-**

**ज्या प्रकरणांमध्ये पिडीत व्यक्तीने अत्याचार झालेनंतर पोलीस संरक्षणाची मागणी केली असेल त्याची नांवासहीत व एकुण प्रकरणांची माहिती तसेच ज्या प्रकरणांमध्ये पोलीस संरक्षण नाकारलेले असेल त्याची माहिती-** माहे **जुलै -२०२४** मधील माहिती निरंक आहे.

क्र.२२ एलसीबी/ अ.जा.ज./माहिती प्रसिध्दी/ **/२०२४**
पोलीस अधीक्षक कार्यालय,कोल्हापूर
ई मेल - **pilcb1111@gmail.com**
दिनांक- **/०८/२०२४**

---

**प्रति,**
**मा.पोलीस अधीक्षक,**
**कोल्हापूर.**

**विषयः-** घटकाचे संकेतस्थळावर माहिती प्रसिध्दी करणेबाबत.

***

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून सादर की, मा.अपर पोलीस महासंचालक, ना.ह.सं., महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्र.पोमसं/४१/नाहसं-टें.नं.२/माहिती आयुक्त म.रा.यांच्या आदेशाची अंमलबजावणी/१०५/२०२१-३६० दि.०१/०४/२०२१ अन्वये अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ व सुधारीत अधिनियम २०१६ मधील तरतुदी नुसार उपेक्षित घटकातील जनतेला यथोचित न्याय मिळावा याकरीता माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम-४ मधील तरतूदी नुसार जनहित असलेल्या माहिती प्रसारणाबाबत राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी दिलेल्या आदेशान्वये महत्वाचे १७ मुद्याप्रमाणे माहिती घटकाचे संकेत स्थळावर प्रदर्शित करणेबाबत आदेशीत केलेले आहे.

तरी अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ व सुधारीत अधिनियम २०१६ अन्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम-४ मधील तरतुदी नुसार जनहित असलेल्या माहिती प्रसारणाबाबत राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिलेल्या आदेशान्वये महत्वाचे १७ मुद्याप्रमाणे माहिती तयार करण्यात आलेले असून सदरची माहे **जुलै -२०२४** ची माहिती ही घटकाचे संकेतस्थळावर प्रसिध्दी होणेस विंनती आहे.

**सोबत-** सदर माहितीची सॉप्ट कॉफी ही पेन ड्राईव्ह वरती देण्यात आलेले आहे.

**(रविंद्र कळमकर)**
पोलीस निरीक्षक
स्था.गु.अ.शाखा, कोल्हापूर